# प्रेसनोट

## 'मा. पोलीस अधिक्षक यांच्या दक्षतेमुळे जखमींना तात्काळ मिळाले उपचार '

जा.क्र. ५०० /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः— ०९/०७ /२०१७

भंडारा :— दिनांक ०९/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मा. विनीता एस. मॅडम हे आपल्या स्टॉपसह जिल्हयातील पोलीस स्टेशनला भेट देण्याकरीता शासकीय वाहनाने निघाले असता सायंकाळी अंदाजे ०५.०० वा. चे सुमारास शहापुर गांवाचे अलीकडे असलेल्या एम. आय. ई. टी. कॉलेज समोर निमआराम बस व मोटार सायकल यांच्यात अपघात झाल्याचे व त्यात मोटार सायकल वरील दोन इसम गंभीर जखमी अवस्थेत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर पडले असल्याचे दिसुन आले पोलीस अधीक्षक विनीता एस. यांनी त्यांचे चालकास आपले वाहन थांबविण्यास सांगुन प्रथमतः दोन्ही जख्मीच्या प्रकृतींची पाहणी करुन त्यांना औषधोपचाराकरीता तात्काळ रुग्णालयात घेवुन जाणे गरजेचे असल्याचे लक्षात येताच त्यांनी त्यांचे वाहनावर आरटीपीसी डयुटीवर असलेले पोलीस कर्मचारी संभा लेनगुरे व चालक कर्मचारी मुकेश कोचे यांना तात्काळ एक वाहन थांबवुन जखमींना उपचाराकरीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे घेवुन जाण्यास सांगीतले व स्वतः नियंत्रण कक्ष भंडारा आणि पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे फोनद्वारे माहीती देवुन घटनास्थळी स्टाफ बोलविला भंडारा जिल्हयाची पार्श्वभूमी पाहता अपघात स्थळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेवुन घटनास्थळावर स्टाफ पोहचेपर्यंत स्वतः घटनास्थळी हजर राहुन रहदारीला कोणताही अडथळा होणार नाही किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची स्वतः काळजी घेतली व जख्मींना औषधोपचाराकरीता रुग्णालयात रवाना केले.

पोउपनि. जे. एम. लाकडे
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र.९४०३४३८५४६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.